पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 17/01/2020 (शुक्रवार)
(दुपार)

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

1) पो.स्टे. नरखेड – दिनांक 14/01/2020 चे 20.00 वा. चे सुमारास पो.स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन नातीन हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रकाश खोपे हे करीत आहे.

2) पो.स्टे. बेला – दिनांक 15/01/2020 चे 12.30 वा. चे सुमारास पो.स्टे. बेला हद्दीत फिर्यादी यांची 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्याम मरसकोल्हे हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 14 कि. मी. अंतरावर चारगाव बस स्टाप समोर येथे दिनांक 02/12/2019 चे 22. 00 वा. ते 22.15 वा. दरम्यान आरोपी नामे– गोविंदा नथ्थुजी वानखेडे, वय 27 वर्ष, रा. भुतेश्वर नगर, नागपुर हा त्याच्या एमएच–49/एझेड–6642 क्रमांकाच्या मोटरसायकलवर मागे बंडु महादेव बन्सोड, वय 46 वर्ष, रा. थडीपवनी यांना बसवुन नागपुर येथुन काटोलकडे जात होता. दरम्यान मौजा चापेगाव येथील बसस्टॉप समोर मोटरसायकल चालकाने स्वतःचे ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपनाणे चालविल्याने त्या गाडीचा संतुलन बिघडल्याने गाडी खड्डयात गेली. त्यामुळे अपघात झाल्याने अपघातात मोटरसायकल चालक गोविंदा वानखेडे याचा मृत्यू झाला. तर मागे बसलेले बंडु बन्सोड हे जखमी झाले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवालदार सुरेश लांडे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक अश्विनी वानखेडे 8888110877 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर